नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १४/०१/२०२५ (मंगळवार) दुपार

---

## प्रतिबंधीत नायलॉन मांजाची विक्री/वापर करणाऱ्या ०५ आरोपीतांविरूद्ध ०५ गुन्हे नोंद

पोस्टे कन्हान:– १) दिनांक १३/०१/२०२५ चे १७.३० वा. ते १८.१५ वा. दरम्यान पोस्टे कन्हान येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता मुखबिरद्वारे माहिती मिळाली कि, यातील **आरोपी नामे सुरज विठठल वानखेडे वय ३५ वर्ष रा धरमनगर दर्गामंदीरा जवळ कन्हान** हा नायलॉन मांजाची विक्री करित आहे. अशा माहिती वरून स्टाफ यांनी धरमनगर पिपरी कन्हान येथे रेड कारवाई केली असता आरोपी कडुन १ मोनो कंपनिच्या ०१ नॉयलॉन चक्री किंमती ३०० रू चा मुद्देमाल जप्त केला.

२) दिनांक १४/०१/२०२५ रोजी पोलीस स्टेशन कन्हान येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनिय माहीती मिळाली कि, संताजी नगर कांद्री येथे संजय सराटकर यांचे घराचे बिल्डींग वर एक इसम हा नायलॉन मांजाचा साहाय्याने पतंग उडवित आहे. त्यावरुन संताजी नगर कांद्री येथे गेले असता त्याठिकाणी एका घराचे गच्चीवर एक इसम पतंग उडवित दिसला. त्याचेजवळील पतंग उडविणा–या धागाची पाहणी केली असता सदर धागा हा नायलॉन मांजा दिसला. सदर इसम **आरोपी संजय सारटकर, रा. संताजी नगर** आरोपीविरूद्ध कलम ५, १५ महाराष्ट्र पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ सहकलम २२३ भा. न्या. संहिता अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

३) दि. १४/०१/२०२५ रोजी पोलीस ठाणे कन्हान परीसरात पिपरी बिट मध्ये महाराष्ट्र शासनव्दारे पतंग उडविण्याकरिता वापरण्यात येणारा नायलॉन मांजा निर्मिती विक्री व वापर बंदी असल्याने त्यांचावर कारवाई करण्याकरिता पेट्रोलींग करित असता केमिकल ग्रॉउन्ड येथे गोपनिय बातमीदाराकडुन माहीती मिळाली की, सोनार मोहल्ला दुर्गा मंदीर जवळुन एक इसम हातात नायलॉन मांजाची चक्री घेवुन पंतग उडविण्याकरिता जात आहे. अशा माहीतीवरून सोनार मोहल्ला दुर्गा मंदीर पिपरी जवळ जावून पाहीले असता एक इसम हातात एक काळया रंगाची चक्री ज्यात कथीया रंगाचा नायलॅन मांजाने भरून असलेली चक्री घेवुन येतांनी दिसला. विधीसंघर्ष बालक याचे ताब्यातुन कथीया रंगाचा नायलॉन मांजा एक काळया रंगाचा प्लॉस्टीक चक्रीत गुंडाळलेल्या अंदाजे किंमती ५०० रू. चा माल जप्त करण्यात आला. आरोपीविरूद्ध ५, १५ महाराष्ट्र पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ सहकलम २२३ भा. न्या. संहिता अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

४) दिनांक १४/०१/२०२५ रोजी पोस्टे कन्हान यांनी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना तारसा चौकात गोपनिय माहीती मिळाली कि, संताजी नगर कांद्री येथे प्रकाश हटवार यांचे घराचे बिल्डींग वर एक इसम हा नायलॉन मांजाचा साहाय्याने पतंग उडवित आहे. त्यावरुन संताजी नगर कांद्री गेले असता त्या ठिकाणी एका घराचे गच्चीवर एक इसम पतंग उडविताना दिसला. सदर इसमास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव **बंटी उर्फ रोहीत किशनलाल शर्मा वय ३६ वर्षे रा. संताजी नगर, ता. पारशिवनी जि. नागपूर** असे सांगीतले. सदर इसमाच्या ताब्यातून १) एका लाकडी गोल काडीमध्ये काळया रंगाचा प्लास्टीक चक्रीत गुंडाळलेला हिरव्या रंगाचा नायलॉन मांजा अ.कि. ३००/– रुपयाचा व एका लाकडी गोल काडी मध्ये ग्रे रंगाचा लाकडी चक्रीत नायलॉन मांजा अ.कि. २५०/– रू

माल जप्त करण्यात आला. त्याचेविरूद्ध कलम ५, १५ महाराष्ट्र पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ सहकलम २२३ भा. न्या. संहित्ता २०२३ अन्वये गुन्हा नोंद आहे.

५) दिनांक १४/०१/२०२५ रोजी कन्हान पोलीस पो. स्टे. परीसरात नॉयलन मांजा कार्यवाही करीता तसेच पेट्रोलींग करीत असताना मुखबीरादारामार्फत माहीती मिळाली की, **विनोद देवाजी येलमुले रा शिवाजी नगर,पिपरी रेड कन्हान हा त्याचे पिपरी रोडवर शिवाजी नगर येथे असलेल्या विनोद किराणा स्टोअर येथे** शासनाची बंदी असलेला नॉयलॉन मांजा बाळगुन ठेवला आहे. यावरुन पोलीसांनी त्याचे दुकानात रेड केली असता त्याचे दुकानात . पिवळया रंगाचा नॉयलॉन मांजा प्रत्येकी अंदाजे कि. १२००/— रु असा एकुण १२००/— रु चा मुद्देमाल मिळुन आल्याने सदर मुददेमाला जप्त करण्यात आला आहे. आरोपीतांविरूद्ध पोस्टे कन्हान येथे ५, १५ पर्यावरण सरंक्षण कायदा १९८६ अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

## प्रतिबंधीत नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

**पोस्टे कुही:—** दि. १४/०१/२०२५ रोजी पोस्टे कुही येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता मौजा कुही येथील शारदा चौकात असंताना गुप्त बातमीदारांकडुन माहिती मिळाली की, नामे प्रमोद लांजेवार हा आपल्या दुकानात महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला नायलॉन मांजा विक्री करीत आहे. अशा माहितीवरून सदर ठिकाणी आरोपी प्रमोद लांजेवार यांचे संतकृपा किराणा दुकान शारदा चौक कुही येथे रेड कारवाई केली असता दुकानात असलेल्या ईसमास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव **प्रमोद गुलाबराव लांजेवार वय ४५ वर्ष रा. वार्ड क्र. ०८ कुही ता. कुही जि. नागपुर** असे सांगितले. त्याचे दुकाणात प्रतिबंधीत असलेला नायलॉन मांझा बाबत सदर दुकाणाची पाहणी केली असता दुकाणाच्या डाव्या बाजुचे कोपऱ्यात खाली असलेल्या चॉकलेटच्या बरणीच्या मागे एक मोनो कंपनीचा लोगो असलेला नायलॉन मांझाची मोठी चक्री दिसुन आली तसेच विक्री करीत असलेला नायलॉन मांझा अधिक कुठे ठेवला आहे. याबाबत विचारले असता त्यांनी सांगितले की अक्षय लांजेवार माझा पुतण्या याचेकडे एक नायलॉन मांझाची चक्री अक्षयला विक्री करण्याकरीता दिलेली आहे. दोन्ही नायलॉन मांजा चक्री प्रतिबंधीत असलेला प्रति किमती १५००/—रू प्रमाणे एकूण ३०००/—रू चा माल जप्त करून आरोपीतांविरूद्ध पोस्टे कुही येथे कलम २२३ भारतीय न्याय संहीता सहकलम ५, १५ पर्यावरण सरंक्षण कायदा १९८६ अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर